- प्रेसनोट –

सराईत वाहन चोर पुन्हा पोलीसांच्या जाळयात ६ दुचाकी जप्त.

---

दि.२४/०१/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत पोलीस उपनिरिक्षक दत्तात्रय मोहिते व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी कृष्णा निढाळकर व सर्फराज देशमुख यांना त्याच्या बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, वाहन चोरी करणारा रेकॉर्ड वरिल आरोपी रव्या धोत्रे हा स्वामी नारायण मंदिराच्या जवळील सर्व्हिस रोडवर व्हिलेज हॉटेल येथे येणार आहे. त्याच्याकडे चोरीची स्प्लेडर मोटार आहे. त्याने अंगात काळे रंगाचे जर्किग घातलेले आहे. सदर ठिकाणी सापळा रचुन रविंद्र उर्फ रव्या बाळासाहेब धोत्रे, वय २६ वर्षे, रा. मु पो. रांजे, ता. भोर, जि. पुणे यास पकडण्यात आले आहे.

रविंद्र उर्फ रव्या बाळासाहेब धोत्रे हा रेकार्ड वरिल गुन्हेगार असल्याने त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने मोटार सायकल चोरी केल्याबाबत सांगितल्याने त्यास अधिक विश्वासात घेवुन त्याच्याकडे तपास करता त्यानी भारती विदयापीठ परिसरातुन, पुणे ग्रामीण हददीतुन गोगलवाडी शिंदेवाडी येथुन दुचाकी चोरल्याचे कबुल केले.

सदर आरोपी यांच्याकडुन पल्सर, ड्रिम युगा, स्प्लेडर २, यमाहा, पॅशन अश्या एकुण ०६ गाडया हस्तगत करण्यात आल्या असुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील ५ गुन्हे, राजगड पोलीस ठाणे पुणे ग्रामीण १ गुन्हा असे एकुण ०६ गुन्हे व २,३०,०००/- रु किंमतीच्या गाडया जप्त करण्यात आल्या आहेत.

सदर आरोपी हा रेकार्ड वरचा असुन त्याच्यावर यापुर्वी सिहंगड, भारती विदयापीठ, पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंढे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते सो कर्मचारी चंद्रकांत फडतरे, कृष्णा निढाळकर, सर्फराज देशमुख, अमोल पवार, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, कुंदन शिदे, अभिजीत रत्नपारखी, गणेश चिंचकर, महेश मंडलीक, शिवदत्त गायकवाड यांनी केलेली आहे.